09

# राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक धोरण

प्रोफेसर–किशोरकुमार गव्हाणे
इतिहास विभाग प्रमुख, एस.पी. कॉलेज, भूम.

## प्रस्तावना :

पुरोगामी महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. भगवान गौतम बुध्दानंतर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी समतेची दिंडी पुढे नेण्याचे व महाराष्ट्रीयन समाज एकसंघ बनविण्यासाठी अथक प्रयत्न केल्याचे दिसते. ब्रिटीश काळातील अनेक संस्थानिकामध्ये राजर्षी शाहूंनी आपल्या कर्तृत्वाने एक वेगळेच स्थान निर्माण केले होते. करवीर संस्थानचा राजा म्हणून नव्हे तर भारतातील प्रगतीशील राजा म्हणून त्यांचा लौकिक आहे. एवढेच नव्हे तर आपल्या खंबीर नेतृत्व व कर्तृत्वाने भारताबाहेर ही त्यांचे कार्य गौरविले गेले. पूर्वजांचा संपन्न वारसा सर्वार्थाने पुढे चालवणारा एक कुशल राजा, संपत्ती व सत्तेचा उपयोग जनतेसाठी करणारा राजा तसेच परदुःख हे स्वदुःख माननारा राजा अशा कितीतरी व्यक्तिमत्वाने त्यांची ओळख आहे. सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर चळवळ अशा अनेक चळवळींना प्रोत्साहन देवून कोल्हापूर हे महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे केंद्र बनविण्याचे कार्य त्यांनी पार पाडले. एवढेच नव्हे तर बहुजन समाजात स्वाभिमानाची फार मोठी जागृती निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. विषमतेचे वातावरण कमी करून समतेचा विचार समाजाच्या मनात वाढविण्याचे कार्यही त्यांनी पार पाडले. एवढेच नव्हे तर बहुजन समाजात स्वाभिमानाची फार मोठी जागृती निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. अस्तित्व शून्य समाजाला त्यांनी आत्माभिमानाचा विचार तर दिलाच पण त्याचा स्त्रोत आत्मज्ञान आणि शिक्षण आहे हे ही, सांगण्यास ते विसरले नाहीत. शाहू महाराजांनी आपल्या विचार आणि समाजक्रांतीच्या कृती शून्य धोरणाच्या कृतीने परिवर्तनाच्या सामाजिक चळवळीत झंझावत निर्माण केला आणि वंचिताच्या दबलेल्या अस्मितेला जागृत केले. शाहू महाराजांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात क्रांतीकारी विचार मांडून त्यांची प्रभावीपणे अमलबजावणीही केली. पैकी त्यांच्या आर्थिक क्षेत्रातील कृषी विषयक कार्याचे महत्व समजावून सांगण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधात मांडणी केली आहे.

## कृषी विषयक धोरण :

जाणता राजा म्हणून इतिहासाला परिचित असलेल्या छत्रपती राजा शाहू महाराजांचा वयाच्या २० व्या वर्षी (इ.स.१८९४) राज्यभिषेक होवून कोल्हापूर संस्थानच्या राजगादीवर विराजमान झाले. राज्याभिषेकाच्या भाषणात ते म्हणाले होते, ''आमची प्रजा सदा–सर्वदा सुखी व संतुष्ट असावी. दिवसेंदिवस तीचे कल्याण वृध्दीगंत व्हावे आणि राज्याचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे.''[१] महाराजांच्या या विधानावरून त्यांचा विकासविषयक दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो. कोल्हापूर संस्थानच्या आर्थिक विकासासाठी कृषी क्षेत्रातील सुधारणांचा त्यांनी पाया घातला. शेती व शेतकरी विकासाच्या विविध योजना त्यांनी राबविल्या. शेतकऱ्यांचे अज्ञान व त्यांचा अशिक्षितपणा, भांडवलाची कमतरता, शेतीचे लहान आकारमान व शेतीमाल विक्री व्यवस्थेच्या अभावामुळे शेतकऱ्यांची स्थिती सुधारत नसल्यामुळे तो पारंपरिक पध्दतीने शेती करतो. या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी जाणिवपूर्वक व नियोजनबध्द पध्दतीने कार्य करून शेतकऱ्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून संस्थानामधील शेतकऱ्यांना सुखी व समृध्द जीवन प्राप्त करून दिले.

राजर्षी शाहू महाराजांचा कृषी विषयक दृष्टिकोन आपणास त्यांच्या वक्तव्यातून ज्ञात होतो. उत्तर प्रदेशमधील कानपूर येथे १९ एप्रिल १९१९ रोजी अखिल भारतीय कुरमी क्षत्रियांच्या तेराव्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्ष पदावरून बोलताना राजर्षी शाहू महाराज म्हणाले की, ''नसत्या जन्माने क्षत्रिय अगर ब्राह्मण झालेल्या लोकांचा आता कोणी आदर करणार



S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O

नाहीत. आपण गुणकर्मानि क्षत्रिय व्हा. आज क्षत्रियांनी कृषिकर्म हे प्रधान कर्म मानले पाहिजे. वैदिक काळातही वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्रीही नांगर हाकीत असत, ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषिकर्म हलके अथवा वाईट असेमी मुळीच मानीत नाही. कृषिकर्म करताना क्षात्रधर्माला बाधा येतो असे नाही.[1] भारतासारख्या कृषिप्रधान देशात, कृषिकर्म हाच क्षात्रधर्म होवून बसलेला असताना; राजर्षी शाहू महाराजांचा हा दूरगामी दृष्टिकोन त्यांच्या दृष्टेपणाची साक्ष देतो. क्षत्रियांनी कृषिधर्म करणे आवश्यक असून भारतीयांचा तोच खराखुरा क्षात्रधर्म असल्याचा शाहू महाराजांनी वस्तुपाठ सांगितला आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या मते शेतीमध्ये जेवढी गुंतवणूक केली जाते त्याच्या कितीतरी पटीने अधिक फळ आपणास प्राप्त होते. ज्याप्रमाणे एक दाणा जमिनीत टाकून हजारो दाणे आपण मिळवतो. संस्थानला सन १८९७ सालच्या दुष्काळाची झळ लागली होती. यावेळी शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारी पाशातून त्यांनी सोडविल्या. शेतकऱ्यांच्या जनावरांना जंगले खुली केली तसेच शेतकऱ्यांना साऱ्याची सूट देवून तगाई मंजूर करण्याचे कार्य त्यांनी केले.[3]

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात किर्लोस्करवाडी येथे नांगरासाठी फाळ तयार करण्याचा कारखाना किर्लोस्करांनी सुरू केला होता. पहिल्या महायुध्दाच्या काळात नांगरासाठी लोखंडाची आयात बंद झाल्याने कारखाना बंद पडून मजूरांवर बेकारीचे संकट निर्माण झाले होते. याशिवाय लाखो शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान होणार होते. कारण या कृषिप्रधान देशातील शेती नांगराविना मार खाल्ली असती व सामान्य जनतेला धान्याची चणचण निर्माण झाली असती. अशावेही कोल्हापूर संस्थानमधील किल्ल्यावरील जुन्या तोफा ''शेतकऱ्यांच्या उपयोगी जर तोफा पडत असतील तर त्यांना द्या''[4] असे सांगून एक दमडी देखील न घेता या तोफा किर्लोस्करांना दिल्या. महाराजांनी आपल्या युवराजांना कृषी विद्या शिक्षण घेण्यासाठी अलाहाबाद आणि विलायतेस पाठविले. याशिवाय शेतकऱ्यांचे शेतीतील अडसर म्हणजे त्यांचे अज्ञान ते दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात शिक्षणाचा कायदा करून मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ केला. या शिक्षणाबरोबरच शेती विषयक शिक्षण देण्याच्या दृष्टिने 'किंग एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टीट्यूट' ही संस्था उभारून त्या करीता एक स्वतंत्र निधी उभारला. या निधीकरीता राजर्षी शाहू महाराजांनी ५००० रूपये दिले आणि या संस्थेला १००० रू. ची वार्षिक ग्रँट (अनुदान) मंजूर केली."

राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात शेतीविकासाला प्राधान्य दिले. शेतीतील उत्पन्न वाढल्याशिवाय शेतकरी सुधारणार नाही आणि शेतकरी सुधारल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही असे ते म्हणत. येथील शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे ती ओलिताखाली आणण्याची गरज होती. यासाठी ३ फेब्रुवारी १९०२ रोजी पाटबंधारे विषयक धोरण जाहीर करून, शेतीला कायम स्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना आखण्यास सुरूवात केली.[6] भोगवती नदीवर त्याकाळचे भारतातील सर्वात मोठे धरण (राधानगरी धरण) बांधण्यास महाराजांनी सन १९०७ मध्ये सुरूवात केली. सन १९१७ पर्यंत या धरणावर २६ लाख रूपये महाराजांनी खर्च केला. पुढे आर्थिक संकटामुळे महाराजांना हे काम बंद करावे लागले. राजर्षी शाहू महाराजांच्या पश्चात राजपुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी हे काम करून खऱ्या अर्थाने हरीतक्रांती घडवून आणली. राधानगरी धरणाबरोबरच अनेक बंधारे, तलाव, कालवे व विहिरी बांधण्यासाठी शाहू महाराजांनी प्रोत्साहन व अर्थसहाय्य दिले. दरबाराच्या मदतीने २०००० विहिरी आणि ४० तलाव खोदण्यात आले. राजर्षी शाहू महाराजांच्या वरील धोरणामुळे हजारो एकर क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत झाली.

संस्थानात सुधारीत शेती पध्दतीचा प्रसार करण्यासाठी कोल्हापूरात शेती–अवजारांचे एक म्युझियम सुरू केले. शेतकऱ्यांना सुधारीत अवजारे, बी–बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पध्दतींचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी कोल्हापूरात सन १९१२ मध्ये शेती संस्था स्थापन केली. यामध्ये सुधारीत शेती उपयोगी अवजारांचे केंद्र उभारण्यात आले.[7] या केंद्रामध्ये सुधारित शेतींचे प्रयोग करून दाखविण्यासाठी एका



S.P.Mahavidyalaya,Bho
Bhoo
Tq.Bhoom Dist.O

व्यक्तीची नेमणूक केली. आज ज्याप्रमाणे कृषी विद्यापीठे व महाविद्यालये आपल्या विस्तार शाखांच्या वतीने कार्य करतात तसा प्रयोग राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात शतकापूर्वीच केला होता हे विशेष होय. शेतकऱ्यांना व जनतेला चांगल्या शेतीमालाची व जनावरांची माहिती व्हावी यासाठी प्रदर्शने भरविण्यात आली. खेडेगावातील शाळातून शेतीविषयक शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली. कोल्हापूरच्या शेतकऱ्यांचा गूळ, बैल, घोडे व गाढवे यांच्यावरून राजापूरला व तेथून 'राजापूरी गूळ' म्हणून कोकणला विकला जाई. यातून शेतकऱ्यांच्या हाती कमी पैसा येई. महाराजांना कोल्हापूरचा गूळ चांगला असतो हे माहिती होते. याचबरोबर संस्थानचा व्यापार वाढावा, बाहेरचा पैसा संस्थानामध्ये यावा व शेतकऱ्यांचे कल्याण व्हावे, या उद्देशाने त्यांनी रेल्वे स्टेशननजीक १८९५ साली शाहुपुरी व्यापार पेठेची स्थापना केली.[८] या पेठेची वाढ होण्याच्या दृष्टीने त्यांनी मुंबई–पुणे येथील व्यापाऱ्यांची मने वळविली. त्यांना सवलती देवून कोल्हापूर हे व्यापारी केंद्र करण्याचा शुभारंभ महाराजांनी केला. अशा रीतीने प्रथम ५–७ दुकानांची शाहुपूरी पेठेची सुरूवात होवून पुढे विकास होवू लागला. त्यावेळी संस्थानात १४००० एकर ऊसाचे क्षेत्र होते. गुळाचा व्यापार २–३ लाखांच्या आसपास होता. आज या शाहुपुरी व्यापार पेठेचे मार्केट यार्डात रूपांतर झाले आहे. ही या व्यापारी पेठेची क्रांतीकारक वाटचाल पाहिली तर द्रष्ट्या राजर्षी शाहू महाराजांच्या व्यापारी दृष्टीकोनाची कल्पना येते.

शाहू महाराजांनी सतत पडणाऱ्या दुष्काळी संकटाचा शेती सुधारणेसाठी उपयोग करून घेतला. त्यांनी शेती सुधारण्यासाठी, विहिरी खोदण्यासाठी, बी–बियाणे विकत घेण्यासाठी, खते तयार करण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी, बैल घेण्यासाठी व शेती उपयुक्त अवजारे खरीदण्यासाठी मुक्त हस्ते शेतकऱ्यांना तगाई कर्ज दिले.[९] या कर्जाचे वैशिष्ट्य म्हणजे ते बिनव्याजी होते. काहींना मात्र ते अल्पव्याजाच्या दराने दिले होते. तगाईची ही रक्कम आस्ते आस्ते परत करावयाची होती. कोणत्या प्रकारचे खत घातले असता कोणते पीक भरघोस येईल याचे खुद्द महाराजांनी कोल्हापूरात प्रयोग करून सुधारीत पद्दतीने शेती करण्याकडे शेतकऱ्यांना प्रयत्नपूर्वक वळविण्याचे कार्य केले. लहान आकारमानामुळे शेती फायदेशीर ठरत नसल्याची जाणीव महाराजांना होती. संस्थानामध्ये विस्तृत जमिनी नसल्याने यापुढील काळात तरी शेत जमिनीचे आणखी लहान–लहान तुकडे होवू नये अशी त्यांची इच्छा होती, याबाबतीत बोलताना शाहू महाराज म्हणाले की, वाटणी व्यवहाराने शेतीचे लहान तुकडे होतात ते किफायतशीर ठरत नाहीत. पर्यायाने शेतकरी तोट्याच्या शेती व्यवसायात अडकून पडतो आणि प्रगतीला मुकतो. यावरून राजर्षी शाहू महाराजांची जमीन धारणा क्षेत्रासंबंधीची भूमिका व दृष्टी लक्षात येते. लहान तुकड्यावरील शेतकरी स्वतःच्या चरितार्थ योग्य रितीने चालवू शकत नसल्याने शेतीचे लहान–लहान तुकडे करण्यास त्यांचा विरोध होता.

आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून कोल्हापूर संस्थानामध्ये महालक्ष्मी रथोत्सव, जोतिबा यात्रा अशा प्रसंगी शेतकरी वर्गासाठी 'शेतकी प्रदर्शने' भरवली जावू लागली. अशा प्रदर्शनातून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ठ उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहितीपत्रके आदींची मांडणी केली जाई. त्या बरोबरच उत्तम पैदाशीच्या जनावरांचेही प्रदर्शन भरवले जाई. काही प्रसंगी शेतकी प्रदर्शनाबरोबर खास ''विज्ञान प्रदर्शन'' ही आयोजित केले जाई.[१०] आपल्या प्रजेत विज्ञान विषयाची गोडी उत्पन्न व्हावी, असे महाराजांना वाटत होते. प्रजाजन, विशेषतः शेतकरी वर्ग मोठ्या संख्येंनी अशा प्रदर्शनांकडे यावा म्हणून त्या सोबत कुस्त्यांच्या दंगली, मर्दानी खेळाचे सामने, हत्तींच्या झुंजी यासारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात. पारंपरीक पध्दतीच्या शेतीतून विशेष आर्थिक लाभ मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी व्यापारी पिकांची लागवड करावी यासाठी स्वतः महाराजांनी पुढाकार घेवून व्यापारी पिकांची लागवड केली. साधारणपणे सर्व व्यवसाय शेतीला पूरक व्हावेत या दृष्टिने त्यांचा शेती संशोधनावर भर होता. महाराजांनी कॉफी–चहा, वेलदोडा या सारख्या पिकांबरोबरच बुंदा, राळ, रेशीम, ताग, रबर, अंबाडी, शिंगोड, टॅपिओका, लाख, कंबोडियन कापूस अशा लागवडीचे संस्थानात प्रयोग केले. शेतीला पुरक व्यवसाय म्हणजे पशुपालन



S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

व दुग्धव्यवसाय. या व्यवसायातूनही शेतकऱ्यांनी आर्थिक लाभ घ्यावेत असे अवाहन त्यांनी केले. शेतकरी हा केवळ शेतीवरच अवलंबून न राहता इतर जोड व्यवसायाच्या माध्यमातून त्याने आपली आर्थिक स्थिती सुदृढ बनवावी आणि सुखी व संपन्न जीवन जगावे ही प्रामाणिक इच्छा व तळमळ राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नातून व विविध प्रयोगातून दिसून येते.

**समारोप–**

भगवान गौतम बुध्दाच्या तत्वज्ञानाप्रमाणे समतेची दिंडी पुढे नेण्याचे व महाराष्ट्रीयन समाज एकसंघ ठेवण्याचे कार्य महाराष्ट्रातील पुरोगामी समाज सुधारकांनी केले, या पुरोगामी समाज सुधारकांमध्ये राजदंड धारण करणारे राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अद्वितीय आहे. आपल्या कुशल नेतृत्वाने एक प्रगतीशिल राजा म्हणून संबंध भारतभर त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. आपल्या सत्ता संपत्तीचा वापर त्यांनी जनकल्याणासाठी केल्याचा दिसतो. दीन दुबळ्यांचे पददलितांच्या दुःखाविषयी हळहळणारा राजा म्हणून त्यांचे स्थान अढळ आहे. सत्ता हाती घेतल्यानंतर समाजाच्या सर्वांगीण हितासाठी त्यांनी राजकीय सत्तेचा वापर केल्याचा दिसतो. वंचितांच्या दबलेल्या आवाजाला आझादी देण्याचे त्यांचे कार्य प्रसिध्द आहे. त्यांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच आर्थिक क्षेत्रातही अनेक सुधारणांचा पाया घातला. आर्थिक क्षेत्रात कृषीविकासाला प्राधान्य देवून त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये हरितक्रांती घडवून आणली. ही हरितक्रांती घडवून आणण्यासाठी बंधारे, कालवे, तलाव, विहिरी बांधून हजारो एकर क्षेत्र ओलिताखाली आणले. शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी शेतीविषयक शिक्षण देणारी संस्था निर्माण केली. संस्थानामध्ये कृषीप्रदर्शनाचे आयोजन केले. कोल्हापूर ही व्यापार पेठ निर्माण करून शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला रास्त भाव मिळण्याची सोय केली. शेतीला पुरक व्यवसाय म्हणून पशुपालन व दुग्ध व्यवसायाची जोड देवून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुदृढ बनविण्याची काळजी त्यांनी घेतली. त्यांच्या कृषि क्षेत्रातील केलेल्या उपाययोजनामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये हरितक्रांती होवून शेतकऱ्यांना सुखी व समृध्द जीवन प्राप्त झाले.

**संदर्भसूची :**

१. डॉ. कांबळे, बलांडे, शिंदे (संपा.): राजर्षी शाहू, नव्या दिशा नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०११ पृ.क्र. ३९०

२. डॉ. एस.एस.भोसले (संपा): क्रांतिसुक्ते : राजर्षीछत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, सुधारित आवृत्ती, नोव्हेंबर १९९१, पृ. क्र. १०१

३. तु.बा.नाईक : छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती: १९७४, पृ.क्र. १०१

४. प्रा. नानासाहेब साळुंखे : शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती २६ सप्टेंबर २०१४ पृ.क्र. १२५

५. डॉ. कांबळे, बलांडे, शिंदे (संपा.): पूर्वोक्त, पृ.क्र. ४७२

६. डॉ. गव्हाणे, डॉ. शिंदे : महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, आवृती–२०१४, पृ.क्र. १६२

७. कित्ता

८. तु. बा. नाईक : पूर्वोक्त, पृ.क्र. १०४

९. कृ. गो. सुर्यवंशी : राजर्षी शाहू राजा व माणूस, श्री. लेखन वाचन भांडार, पुणे:२ पहिली आवृत्ती– फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. १२४

१०. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २६ जून २००७, पृ.क्र २०३

❑❑❑

KG



PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist. Osmanabad